RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(२५)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ६८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **४ जुलै २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LXI OF 2025.**

A BILL

TO AMENDMENT MUMBAI VILLAGE PANCHAYAT ACT, 1958.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१.**

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** यात पुढे दिलेल्या प्रयोजनासाठी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :— सन १९५९ चा मुंबई अधिनियम १९६२ चा महा. ५.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

१९५९ चा मुंबई अधिनियम क्र.३ च्या कलम १४ ची सुधारणा.

**२.** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १४ मधील पोट-कलम (१) मध्ये खंड (ज-४) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

जी व्यक्ती-तिच्या मालकीच्या घरात राहत असून त्या घरामध्ये शौचालये नाही व ती शौचालयाचा नियमितपणे वापर करीत नाही अशा व्यक्तीला तिचे सदस्यत्व रद्द न करता विशिष्ट कालावधीत शौचालयाचे बांधकाम करणे बंधनकारक करावे व त्याउपरही त्या व्यक्तीने त्या कालावधीत शौचालय बांधकाम न केल्यास कारवाई करण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांनी त्यांच्या राहत्या घरी शौचालय बांधकाम न केल्यास सदस्यत्व रद्द करण्याची तरतूद आहे.

शौचालय बांधकाम न केल्याच्या कारणावरून चंद्रपूर जिल्ह्यात सुमारे ३०० ग्रामपंचायत सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या ग्रामपंचायत सदस्य वा सरपंच यांचे पद रद्द करण्याच्या कार्यवाहीला सहा-सहा महिने, वर्ष-वर्ष विलंब लागतो. मात्र केवळ शौचालयाचे बांधकाम केले नाही या कारणावरून ग्राम पंचायत सदस्यांचे सदस्यत्व तात्काळ रद्द करणे ही बाब मात्र तत्वतः न पटणारी आहे. शौचालयाचे बांधकाम न करणे ही बाब केवळ गरीबीशी संबंधित आहे. ज्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आदी मागासित संवर्गातील व्यक्ती आज ग्राम पंचायत सदस्य पद भूषवित आहेत. पूर्वी हे नागरिक अतिशय गरीब परिस्थितीचा सामना करीत असल्यामुळे ते शौचालयाचे बांधकाम करू शकले नाही. आज लोकप्रतिनिधी म्हणून लोकशाही मुल्यांच्या माध्यमातून त्यांना स्वतंत्र ओळख प्राप्त झाली आहे. त्या माध्यमातून विकासाच्या मुख्य प्रवाहात ते आले आहेत. असे असताना केवळ शौचालय बांधकाम केले नाही म्हणून त्यांचे सदस्यत्व रद्द करणे ही बाब त्यांच्यावर अन्याय करणारी व लोकशाहीच्या मुल्यांना मारक ठरणारी आहे. मंत्री, खासदार, आमदार यांच्यावर गैरव्यवहाराचे आरोप होतात. अनेक घोटाळ्यांमध्ये मंत्र्यांची नावे येतात. गंभीर स्वरूपाचे आरोप असताना देखील या लोकप्रतिनिधींची पदे मात्र कायम राहतात. घोटाळ्यांमध्ये गंभीर आरोप झाल्यानंतरही तात्काळ त्यांचे राजीनामे घेतले जात नाहीत. अशा भ्रष्टाचारी लोकप्रतिनिधींवर वचक ठेवण्यासाठी आपल्याकडे कायदे अपुरे आहेत, मात्र ग्रामीण भागात जनतेची सेवा करण्यासाठी मागासित संवर्गातील व्यक्ती ग्राम पंचायत सदस्य म्हणून निवडून जातात. मात्र कायद्याचा अनुचित वापर करून त्यांचे सदस्यत्व केवळ शौचालय बांधकाम केले नाही या कारणावरून रद्द केले जाते. ही बाब अतिशय गंभीर आहे. या निर्णयाचा गांभीर्यपूर्वक फेरविचार होणे अत्यंत गरजेचे आहे.

वरील उद्दीष्ट्ये साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**

मुंबई, **सुधीर मुनगंटीवार,**

दिनांक १८ जून २०२५. प्रभारी सदस्य.

**विधान भवन :**
मुंबई, **जितेंद्र भोळे,**
दिनांक ०४ जुलै २०२५. सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.